**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**जुने जिल्हा परिषद भवन, त्र्यंबक नाका, पोस्ट ऑफिस शेजारी, नाशिक - 422001**
**दुरध्वनी क्र.** 0253-2977374 **Email- mahakumbhanashik@gmail.com**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/प्राधिकरण निधी बैठक-फेब्रु-02/2026 दि.स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,

1 मा.जिल्हाधिकारी, नाशिक.
2 मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
3 मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
4 मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
5 मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
6 मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
7 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
8 मा.मुख्यधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद
9 मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
10 मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
11 मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
12 मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
13 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टोंमेंट, नाशिक.
14 मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
15 मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
16 मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
17 मा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
18 मा.जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
19 मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक.
20 मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
21 मुख्यधिकारी, शिर्डी नगरपालिका
22 मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.

**विषय : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दिनांक 10/03/2026 रोजी मा.अध्यक्षतेखाली झालेल्या सिंहस्थ कुंभमेळा बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळा 2026-27 प्राधिकरणाची दि.10/03/2026 मा.अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नियोजित बैठक संपन्न झालेली आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक महोदयांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

**आपला विश्वासु**

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 15-04-2026 15:57:38

**( योगेंद्र चौधरी )**
**उपायुक्त (नियोजन)**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.**
**नाशिक**

# दि.१०.०३.२०२६ रोजीचे बैठकीस उपस्थितांची यादी

१ जिल्हाधिकारी, नाशिक.

२ जिल्हाधिकारी, आहिल्यानगर

३ पोलीस आयुक्त, नाशिक शहर (यांचे प्रतिनिधी)

४ पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण. (यांचे प्रतिनिधी)

५ आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.

६ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.

७ विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक

८ कार्यकारी अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.

९ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.

१० अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक

११ अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.

१२ सह संचालक,लेखा व कोषागार विभाग, नाशिक

१३ सह संचालक,नगर रचना विभाग, नाशिक

१४ कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.

१५ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.

१६ जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक. (यांचे प्रतिनिधी )

१७ कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक

१८ सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.

१९ मुख्य कार्यकारी अधिकारी, NMSCDCL.

**नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दि.10/03/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

दि. 10/03/2026 रोजी डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीला सुरुवात झाली.

**विषय क्र. 1 :- दि.17.02.2026 रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे..**

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा आयुक्त यांनी दि.17/02/2026 रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताला मान्यता देण्याबाबत सर्व प्राधिकरण सदस्यांना विनंती केली. त्यानुसार प्राधिकरणाच्या बैठकीच्या इतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. 2 :- नाशिक येथील तीर्थक्षेत्र रामकुंड, त्र्यंबकेश्वर येथील तीर्थक्षेत्र कुशावर्त व नवीन घाट येथे ध्वजस्तंभाचे बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी सिंहस्थ कुंभमेळयाचे अनुषंगाने नाशिक येथील तीर्थक्षेत्र रामकुंड, त्र्यंबकेश्वर येथील तीर्थक्षेत्र कुशावर्त व नवीन घाट येथील ध्वजाचे महत्त्व, त्यावरील चिन्हे, प्रतिके, ध्वजासाठी वापरले जाणारे धातू व अनुषंगिक आवश्यक माहिती दिली. याबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, याबाबत रकमेची खात्री करूनच प्रस्ताव सादर केलेला आहे. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु.7.9 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

याबाबत अध्यक्ष यांनी पुन्हा निदर्शनास आणून दिले की, वेळोवेळी आवश्यकतेनुसार विविध विभागांमार्फत सिंहस्थ कुंभमेळ्याशी संबंधित कामांचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. तसेच विविध विभागांमार्फत त्या त्या विभागाच्या निधीतून / योजनेतूनही अशा पध्दतीची कामे मंजूर होत आहेत. याबाबत नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण 2025 चे कलम 2 (m) आणि 7 (1) (a) नुसार 'कुंभमेळा योजना' अधिनियमातील तरतुदींनुसार लवकरात लवकर अंतिम करावा. याद्दष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

**विषय क्र. 3 :- सिंहस्थ कुंभमेळा अनुषंगाने त्र्यंबकेश्वर परिसरातील ब्रम्हगिरी, छोटा व मोठा प्रदक्षिणा मार्ग व अंजनेरी निसर्ग पर्यटन विकास कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

उपवनसंरक्षक, (प) नाशिक यांनी ब्रम्हगिरी, छोटा व मोठा प्रदक्षिणा मार्ग व अंजनेरी निसर्ग पर्यटन बाबत माहिती दिली. याबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी प्रदक्षिणामार्गात कथानक (Story Line) ठिकठिकाणी करण्यात यावेत व ज्या ठिकाणी एकसारखेपणा / एकरुपात (uniformity) आवश्यक आहे तेथे एकत्रित टेंडर देण्यात यावे असे निर्देश दिले. तसेच असेही निर्देशित केले की या कामांना महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची मान्यता देखील घेण्यात यावी. सबब, प्राधिकरणाच्या वतीने मान्य असलेल्या रक्कम रु.23.12 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तथापि, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन (eco-tourism) अंतर्गत मान्यता प्राप्त झाल्यास सदरचा खर्च प्राधान्याने त्या लेखाशीर्षातून करावा, असेही निर्देशित करण्यात आले.

**विषय क्र. 4 :- नाशिक परिक्रमा मार्ग (Nashik Ring Road) विकसित करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

कार्यकारी अभियंता,म.रा.पा.सु.वि.म. यांनी नाशिक परिक्रमा मार्गासंबंधी सविस्तर माहिती दिली व याबाबत शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. आरएमआर २०२५/प्र.क्र.१२३/रस्ते-१ दि.24.02.2026 नुसार मान्यता देण्यात आल्याची बाब निदर्शनास आणून दिली. याबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी कंत्राटदारांना प्रशिक्षण देण्यात यावे असे सुचविले त्यास मा.अध्यक्ष महोदयांनी संमती दर्शवून प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु.3954.00 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच सदरचे काम कोणत्याही परिस्थितीत सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आधी पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी असे निर्देशित केले. विशेषत: इतर रस्त्यांसोबतची जोडणी (interchanges) यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अपूर्ण राहणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी असे निर्देश दिले.

**विषय क्र. 5 :- गोदावरी नदीवरील उजव्या तिरावर टाकळी येथे गोदावरी नंदिनी नदीच्या संगमाच्या वरील बाजूस 300 मीटर लांब घाट बांधणे या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग यांनी नंदिनी नदीच्या संगमाच्या वरील बाजूस ३०० मीटर लांबीचा घाट बांधण्याबाबत सविस्तर माहिती दिली. सदर घाटाबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी घाटाचा रस्ता, प्रवेशद्वार आणि बाहेर पडण्याचे मार्ग याबाबत विचारणा केली असता, कार्यकारी अभियंत्यांनी तिथे 4 प्रवेश व निर्गमन मार्ग असल्याचे नमूद केले.

मा.अध्यक्ष महोदयांनी घाटाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या नियोजनाबाबत (किंवा आखणीबाबत) नाशिक महानगरपालिकेशी समन्वय साधून पक्का रस्ता करण्यात यावा, तसेच घाट परिसरात इतर सुशोभीकरण करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. श्रीमती सोनल शहाणे, कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांनी स्पष्ट केले की, प्रस्तावात नमूद रु. 63.14 कोटींची आवश्यकता नसून प्रत्यक्षात रु. 44.53 कोटींच्या कामास मान्यता देण्याची त्यांनी विनंती केली. त्यानुसार पुढील भविष्यात घाटाकडे जाणारा पक्का रस्ता करण्याच्या अटीस अधीन राहून या प्रकल्पास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. 6 :- पंचवटी विभागातील कर्मा हाईट्स ते तपोवन एस.टी.पी. ते स.नं.357 ते नांदुर गांव रस्ता करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

अपर आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी पंचवटी विभागातील कर्मा हाईट्स ते तपोवन एस. टी. पी. ते स. नं. 357 ते नांदुर गाव रस्ता बाबत माहिती दिली. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु. 20.22 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

तद्नंतर मा. अध्यक्ष महोदयांनी सदर महानगरपालिकेतील सर्व कामांबाबत शासनाचा व महानगरपालिकेचा भागहिस्सा किती राहील, याबाबत सुस्पष्टपणे शासनास विचारावे, असेही निर्देशित केले.

**विषय क्र. 7 :- कुंभमेळा 2026-2027 साठी ब्रँडिंग व मीडिया व्यवस्थापनासाठी क्रिएटिव्ह मिडिया एजन्सीची निवड करुन त्यांचेकडून माहिती, प्रसार, जनसंपर्क व ब्रँडिंग यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

कुंभमेळा आयुक्त यांनी कुंभमेळयाची विविध स्तरावरील आयोजन, संकल्पनात्मक मांडणी, नियोजन व कार्यक्रमाच्या पूर्णत्वापर्यंत तसेच प्रभावी माहिती, प्रसार, ब्रेडिंग व जनसंपर्क करण्यासाठी क्रिएटिव्ह मिडीया एजन्सीची गरज असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. मा.अध्यक्ष महोदयांनी सदर बाब निश्चितच आवश्यक असल्याचे नमूद केले परंतु संस्थेवरील प्रतिमाह रकमेच्या खर्चाबाबत खात्री करावी असे निर्देश देण्यात आलेत. यावर कुंभमेळा

आयुक्त यांनी, गरजेनुसार सदर कामांसाठी मनुष्यबळ संस्थेकडून ठरवून घेण्यात येणार असून त्यानुसारच प्रतिमाह रक्कम निश्चित करण्यात येणार आहे असे नमूद केले. तसेच केंद्रीय संचार केंद्र (Central Bureau of Communication - CBC) माहिती आणि प्रसारण यांचे मार्गदर्शक तत्वांनुसार विहित कार्यप्रणाली राबविण्यात येईल, असेही नमूद केले. याबाबत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून निविदा कागदपत्रांची पुनः पडताळणी (Vetting) करून घ्यावी आणि माहिती व जनसंपर्क विभागातील सक्षम प्राधिकाऱ्याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त करून घ्यावी, अशा निर्देशांसह रु. 27.00 कोटींच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

तसेच रु. 25.00 कोटीपेक्षा अधिक रकमेची भांडवली स्वरुपाची कामे वित्त विभागाकडे पडताळणीसाठी पाठविण्यात येत असली तरीही यासारखी इतर सर्वच अशी मोठी कामे देखील त्यांच्याकडे पडताळणीसाठी पाठवावित, असे निर्देशित करण्यात आले.

**विषय क्र. 8 :- नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ 2027 करिता Integrated Mobility Plan तयार करण्यासाठी Indian Institute of Management (IIM), नागपूर यांची नियुक्तीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

कुंभमेळा आयुक्त यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे 2027 मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि IIM नागपूर यांच्यात 22 ऑगस्ट 2022 रोजी सामंजस्य करार (MoU) झाला होता. या करारानुसार, कुंभमेळ्याचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी 'इंटिग्रेटेड मोबिलिटी प्लॅन' (Integrated Mobility Plan) तयार करण्याचा प्रस्ताव नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने (NTKMA) 29 जानेवारी 2026 रोजी शासन नगरविकास विभागाला सादर केला होता. या प्रस्तावातील कामाची व्याप्ती (Scope of Work) आणि सुधारित अटी व शर्तीना आता शासन नगरविकास विभागाने मान्यता दिलेली असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. सबब, प्राधिकरणाच्या वतीने मान्य असलेल्या रक्कम रु.10.24 (+GST) कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. 9 :- त्र्यंबकेश्वर रुग्णालय हस्तांतरण – उपजिल्हा रुग्णालय त्र्यंबकेश्वर स्थलांतरण व पुढील 3 वर्ष भाडे व इतर सुधारणा करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी कुंभमेळा दर्शन पथ निर्मितीसाठी त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालय भाडे तत्वावर स्थलांतरित करणे आवश्यक असून, त्यासाठी अंजनेरी येथील स्वामी विवेकानंद हॉस्पिटल हे प्रतिमाह पुढील 3 वर्षासाठी भाड्याने घेत असलेबाबत माहिती दिली. यावर मा.अध्यक्ष महोदयांनी उपजिल्हा रुग्णालयाचा खाटा व स्वामी विवेकानंद हॉस्पिटल येथील खाटा याबाबत माहिती जाणून घेतली आणि उपजिल्हा रुग्णालयाच्या खाटा व स्वामी विवकानंद हॉस्पीटलच्या खाटा यांचा वापर नियमित करण्यात येईल या अटीवर मान्यता देत असल्याचे सूचित केले. सबब, प्राधिकरणाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय स्थलांतरण व पुढील 3 वर्षाचे भाडयाची रक्कम रु.1.72 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

तसेच मा.अध्यक्ष महोदयांनी उपजिल्हा रुग्णालयाचे प्रस्तावित रुग्णालय बिल्वतिर्थ ट्रस्ट्रच्या जागेत करण्यात येणार आहे व त्याशेजारी दर्शनीय विहंगम दृश्य तसेच पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे उपजिल्हा रूग्णालयाची कायमस्वरूपी जागा निश्चित करतांना मुख्य रस्त्यापासून आणि वस्तीपासूनचे अंतर आणि परिसरातील निसर्ग याचा एकत्रित विचार करून आवश्यकतेनुसार जागा बदलावी आणि त्याकरिता आवश्यकतेनुसार इतर प्रशासकीय औपचारिकता पूर्ण कराव्यात.

**विषय क्र.** 10,11,12 **:- त्र्यंबकेश्वर कावनई (कपिलधारा तिर्थ ) येथे करण्यात येणारी विकास कामे आणि चक्रतिर्थ चाकोरे, बेजे व टाकेद येथे करण्यात येणारे विकास कामांचा आराखडयास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत..**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी त्र्यंबकेश्वर कावनई (कपिलधारा तीर्थ), चक्रतिर्थ चाकोरे, बेजे व टाकेद येथे करण्यात येणाऱ्या विकास कामांची माहिती दिली. मा.अध्यक्ष महोदयांनी सदर कामे ही तिर्थक्षेत्र विकास आराखडयामार्फत करणे आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. तेव्हा जिल्हाधिकारी नाशिक यांनी ‘अ’ वर्ग तिर्थक्षेत्र असणे आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर क्षेत्र हे ‘अ’ वर्गात येत नसल्याचे सूचित केले. मा.अध्यक्ष महोदयांनी सदर कामांचे नियोजन व कालावधी विचारात घेता कामे विहित मुदतीत पूर्ण करणेबाबत निर्देश दिलेत. सबब, प्राधिकरणाच्या वतीने कावनई साठी रक्कम रु.35.98 कोटी व चाकोरे, बेजेसाठी रक्कम रु.23.14 आणि टाकेद साठी रक्कम रु.23.67 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.** 13 **:- मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी/ आयत्या वेळी येणारे कोणतेही विषय..**

**अ) त्र्यंबकेश्वर येथील आखाडयांच्या कामांच्या कार्यान्वयीन यंत्रणेत बदल करणे :-** दि.17.02.2026 रोजीचे प्राधिकरणाच्या बैठकीत त्र्यंबकेश्वर शहरातील विविध दहा आखाडे (आनंद, अग्नी, अटल, आवाहन, बडाउदासिन, जुना, महानिर्वाण, नया उदासिन, निरंजनी, निर्मल) मध्ये करण्यात येणारे कामांचे एकूण 10 कोटीची प्रशासकीय मान्यता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून देण्यात आलेली आहे. सदर कामांची कार्यान्वयीन यंत्रणा त्रिंबक नगरपरिषद, त्र्यंबकेश्वर करण्यास प्राधिकरणाच्या वतीने मान्यता देण्यात आली.

**ब) गंगापूर धरण पंप मशीनरी बदलणे व श्रेणीवाढ करणे :-** आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी गंगापूर धरणाची पंप मशिनरी बदलणे व श्रेणीवाढ करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणासमोर सादर केला. यावर मा.अध्यक्ष महोदयांनी सदर काम महानगरपालिकेच्या स्वनिधीतून (नियमित खर्चातून) का करण्यात येत नाही, अशी विचारणा केली. तसेच, सदर कामाचा समावेश महानगरपालिकेने सादर केलेल्या आराखड्यात आहे किंवा कसे, याबाबत माहिती मागितली.

यावर महानगरपालिका आयुक्तांनी स्पष्ट केले की, सदर काम आराखड्यात समाविष्ट असून पंप मशिनरी 25 वर्षाहुन जुनी झाल्याने ती बदलणे व कुंभमेळयाचे अनुषंगाने त्यात श्रेणीवाढ करणे तांत्रिकदृष्ट्या आवश्यक असल्याचे नमूद केले. याबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी असे सूचित केले की, पंप मशिनरी बदलणे हा महानगरपालिकेच्या नियमित व्यवस्थापनाचा भाग असून महानगरपालिकेच्या स्वनिधीतील खर्चाचे नियमित कामकाजातून करणे आवश्यक असल्याची बाब सूचित केली. तथापी सदर कामाचा प्रस्ताव आगामी शिखर समितीकडे यथोचित मार्गाने सादर करण्यात यावा व त्यानंतरच पुढील निर्णय घेण्यात येईल, असे निर्देश दिले.

सबब, वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.03.02.2026 मधे नमूद केल्यानुसार दि.15.02.2026 व त्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यात येऊ नये असे शासन निर्देश आहेत. तथापी सदरील शासन निर्देश हे दि.31.03.2026 पर्यंत होणाऱ्या खर्चासाठी लागू आहेत व उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित प्रशासकीयमान्यते अंती कोणताही खर्च दि.31.03.2026 पावेतो होणार नसून सदरील कामे दीर्घमुदतीची असल्याने प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक असल्याची खात्री करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांपैकी जी कामे शासनाचे पत्र दिनांक 29/08/2025 मध्ये नमूद नाही आणि / किंवा रु. 5140.01 च्या मान्यतेच्या पलीकडे आहे त्या सर्व कामांबाबत नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम 2025 मधील तरतुदींनुसार शासनाची मान्यता घ्यावी लागेल. त्यानुसार सदर प्रस्ताव हे

शासनाकडे शिखर समितीकडे कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात यावे. तसेच प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करतांना झालेल्या चर्चेनुसार उचित अटी व शर्ती टाकण्याची दक्षता कुंभमेळा आयुक्त यांनी घ्यावी, असे मा. अध्यक्षांनी निर्देशित केले. त्याचप्रमाणे आधी नमूद केल्यानुसार अधिनियमातील तरतूदींनुसार कुंभमेळा योजना लवकरात लवकर अंतिम करावी, असे मा. अध्यक्षांनी निर्देशित केले.

कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून बैठक समाप्त करण्यात आली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 09-04-2026 20:23:53

**(डॉ.प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक**